**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्रमांक पोमसं/८-अ/नि.सू.-२०१५-१६(प्र.लि. ते का.अ.)/मुफसल/३४/२०१६ मुंबई दिनांक:१८/०४/२०१६.

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपिक संवर्गातील खालील प्रमुख लिपिकांना कार्यालय अधीक्षक पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | प्रमुख लिपिकाचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री महादेव दशरथ सोनकुसरे | पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र | पोलीस अधीक्षक, वि.कृ.दल, नागपूर |
| २. | श्री.राजेंद्र नामदेव कवडे | अपर पो.म.सं., गु.अ.वि.,म.राज्य, पुणे | वि.पो.म.नि., कोल्हापूर परिक्षेत्र |
| ३. | श्री.अनंतराव माधवराव चैतन्य | समादेशक, रारापोबल, गट क्र.७, दौंड | समादेशक, रारापोबल, गट क्र.१० सोलापूर |
| ४. | श्री.गणपत दौलतराव मांडवगडे | पोलीस अधीक्षक, वि.कृ.दल,नागपूर | समादेशक, रारापोबल, गट क्र.४ नागपूर |
| ५. | श्री.मिलींद नामदेव वाघमारे | पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड | वि.पो.म.नि., अमरावती परिक्षेत्र |
| ६. | श्रीमती मंजुश्री महादेव काळे | समादेशक, रा.रा.पो.बल, गट, क्र.१ पुणे | समादेशक, रा.रा.पो.बल, गट, क्र.२ पुणे |

**प्रवीण दीक्षित**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत,**

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड / वि.कृ.दल,नागपूर
समादेशक, रा.रा.पो.बल, गट, क्र.१ पुणे / २ पुणे /४ नागपूर/ ७, दौंड / गट १० सोलापूर

२. सदर पदोन्नती ही पोलीस महासंचालकांच्या मुफसल लिपिक संवर्गातील दि.३१/८/२०१६ अखेरची बिंदुनामावली शासनाकडून प्रमाणित करण्याच्या अधिन असून बिंदूनामावलीच्या आरक्षणामध्ये काही फेरफार झाल्यास त्यानुसार संबंधीत परिणाम होणाऱ्या प्रवर्गातील कार्यालय अधीक्षकांना प्रमुख लिपिक पदावर तात्काळ पदावनत करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

३. उपरोक्त प्रमुख लिपिकांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयात पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पहावी.

४. **तसेच, शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.वशिअ-१२१४ / प्र.क्र.२६ /११, दिनांक ०२/०६/२०१४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार वर नमूद प्रमुख लिपिकांकडून ३१/०३/२०१६ अखेर पर्यतचे मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यानंतरच त्यांना पदोन्नती ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे, व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

५. उपरोक्त प्रमुख लिपिकांविरुध्द वरिलप्रमाणे काहीच प्रलंबित नसेल तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना **पर्यायी प्रमुख लिपिकाची वाट न पाहता**, पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, त्यांना कार्यमुक्त केल्याचा व ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

६. घटक प्रमुखांनी संबंधीत प्रमुख लिपिकाना विनाविलंब कार्यमुक्त न केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी त्या घटकप्रमुखांची राहील.

७. शासन निर्णय, वित्तविभाग, क्रमांक पीअेच्वाय्/१०८२/सीआर्/११००(२)/अेस्ईआर्-३, दिनांक ६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त प्रमुख लिपिकांनी कृपया नोंद घ्यावी.

८. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

९. वर नमूद प्रमुख लिपिकांपैकी ज्यांना पदोन्नती नाकारावयाची असेल, त्यांनी त्यांचे अर्ज **सात दिवसांचे** आंत घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावेत.

**प्रत सस्नेहः-**

महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत :-** अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर

कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, १२

**(अर्चना त्यागी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करिता